अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | गुरुवार दि. १० नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ४४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# मॅडम, बाईंना घेऊन बंगल्यावर या!

## ▪ गटशिक्षणाधिकाऱ्यांचा आदेश, निनावी पत्राचा बॉंब
## ▪ प्रशासनाची बघ्याची भूमिका, साठेंमुळे झाला स्फोट

✔ सुराज्य/सोलापूर

**गेल्या सहा ते सात महिन्यांचा कालावधी. जिल्हा परिषदेतील एक गटशिक्षणाधिकारी एका शिक्षक महिलेला देताहेत त्रास. तिने शिक्षणाधिकाऱ्यांपासून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत सगळ्यांकडेच केल्या तक्रारी. पण प्रशासन बसले गप्प. त्यात मुख्याद्यापिकेमार्फत निरोप आला, 'मॅडम, बाईंना घेऊन फराळाला बंगल्यावर या.'ती शिक्षिका खवळली. स्वत:चे स्वत्व टिकवण्यासाठी तिने थेट जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते काका साठे यांनाच निनावी पत्र लिहिले. ते पत्र साठेंनी आणून थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या टेबलवर टाकले. तेच पत्र पत्रकारांना देत 'यावर बातमी करा'असे सांगत स्फोट केला आणि बघ्याची भूमिका घेणारी जिल्हा परिषद हादरली.**

हा सगळा प्रकार घडला आहे बुधवारी दुपारी. जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते बळीरामकाका साठे तावातावाने जिल्हा परिषदेत आले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात गेले आणि तितक्याच तावातावाने बाहेर आले. त्यांचा तो ताव पाहून काही तरी गडबड असावी अशी शंका आली म्हणून माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांना हटकले. त्यावेळी त्यांनी एक पत्रच माध्यमांसमोर ठेवले आणि म्हणाले, 'हे वाचा आणि याची बातमी करा.' जेव्हा ते पत्र वाचले गेले; तेव्हा एक गटशिक्षणाधिकारी एका शिक्षक महिलेला कशापध्दतीने नको तो त्रास देतात, हे उघड झाले आणि सगळेच हादरून गेले.

### गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या कामगिरीचे फुटले बिंग

संबंधित शिक्षिकेने मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना २२/१०/२०२२ रोजी पत्र पाठवून त्या गटशिक्षणाधिकाऱ्यांचा 'पराक्रम' कळवला होता. शिवाय तत्कालीन शिक्षणाधिकारी लोहार यांच्याकडेही तक्रार केली होती. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दखलच घेतली नाही. शिक्षणाधिकारी तर लाच प्रकरणात अडकले. त्यामुळे संबंधित शिक्षिकेने शेवटी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह बळीराम साठेंनाही निनावी पत्र लिहिले आणि साठेंमुळे गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या कामगिरीचे बिंग फुटले.



### बंगल्यावर या... घरी कोणी नाही

तिकडे जि.प. प्रशासनाने २२/१०/२०२२ रोजी पत्रावर कोणतीच कारवाई केली नाही. इकडे गटशिक्षणाधिकाऱ्याचे धाडस वाढले. त्याने चक्क संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेकडे निरोप पाठवला. 'त्या' बाईंना घेऊन ५ किंवा ६ नोव्हेंबरला बंगल्यावर दिवाळी फराळासाठी बोलावले. विशेष म्हणजे त्यावेळी घरात कोणी नसल्याचे आवर्जून सांगितले. गटशिक्षणाधिकाऱ्यांचे हे धाडस पाहून संबंधित शिक्षिकेने स्वत:ची व जि.प.ची अब्रू वाचवण्यासाठी काका साठेंना निनावी पत्र लिहिले आणि या प्रकरणाचा स्फोट झाला.

### मुख्यमंत्री किंवा पालकमंत्र्यांच्या गाडीखाली आत्मदहन

या निनावी पत्रात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यावर १५ नोव्हेंबरपर्यंत कारवाई करावी, अन्यथा १९ नोव्हेंबर रोजी सोलापूर दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री किंवा पालकमंत्री यांच्या गाडीखाली आत्मदहन करणार असल्याचा इशारा संबंधित महिलेने काका साठेंना १ नोव्हेंबर रोजी पाठवलेल्या निनावी पत्रात दिला आहे. शिवाय मुख्य कार्यकारी अधिकारी काहीच कारवाई करत नसल्याची तक्रारही याच पत्रात करण्यात आली आहे. त्यामुळे हा प्रकार प्रशासनाला माहिती असल्याचे उघड झाले आहे.



### हे काय चाललंय शिक्षण विभागात?

काका साठे यांनी ते निनावी पत्रच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर टाकले आणि विचारले,' हे काय चाललंय शिक्षण विभागात तुमच्या?' त्यावर बोलायला त्यांकडे उत्तर नव्हते. मात्र या घटनेनंतर माध्यमांनी जेव्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विचारले; तेव्हा याबाबत तात्काळ चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सांगून ते मोकळे झाले. अँटिकरप्शनच्या जाळ्यात नुकतेच सापडलेले शिक्षणाधिकारी लोहार आणि त्यानंतर गटशिक्षणाधिकाऱ्याचा प्रताप याचीच दिवसभर चर्चा ऐकायला मिळाली.

---

# ऊसाची 'काटामारी' रोखण्यासाठी 'संगणकीकरणाचा प्रस्ताव'

**▪ ऊस वजन काट्याची नवी प्रणाली लागू**

✔ सुराज्य/सोलापूर

सर्व साखर कारखान्याच्या वजन काट्यामध्ये एकसमानता आणून संगणकीय प्रणालीद्वारे पारदर्शकता तयार करण्याचा प्रस्ताव राज्याच्या नियंत्रक वैद्यमापन विभाग व अतिरिक्त पोलीस महासंचालकाकडे पाठविण्यात आला आहे. साखर आयुक्त शेखर गायकवाड हे स्वतः या विषयावर काम करीत आहेत. साखर कारखान्याच्या वजन काट्यावर मोठ्या प्रमाणात वजन चोरी होते. काटामारी करणारे कारखाने बाहेरील खाजगी काट्याचे वजन ग्राह धरत नसल्याच्या तक्रारी आल्या आहेत.

शेतकरी व विविध संघटनांनी ही हा विषय उचलून धरला असल्यामुळे सर्व साखर कारखान्याचे संगणकीकरण होण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. साखर कारखान्यामधील वजन काट्यांची तपासणी जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारीत भरारी पथकामार्फत केली जाते.मात्र पथके असूनही काटामारी होते. शेतकऱ्यांना ऊस वजनाच्या पावत्या दिल्या जात नाहीत. वजनात पारदर्शकता नसल्यामुळे दर हंगामात शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपयाचा फटका बसतो. अशा तक्रारी साखर आयुक्तालयाकडे आल्या आहेत. राज्यातील सर्व कारखान्यामधील वजन काट्याचे कॅलिब्रेशन एकसमान करावे लागेल.संगणकाच्या माध्यमातून एकसमानता आणल्यास गैरप्रकार थांबू शकतील.संगणकीय प्रणाली नेमकी कशी असावी याबाबत अभ्यास केला जाणार आहे.मात्र खाजगी वजन काट्याची पावती ग्राह्य न धरण्याची भूमिका कारखान्यांना सोडावी लागेल. कारण वैद्यमापन विभागाच्या नियंत्रकांनीच सर्व काटे एकसमान असल्याचा निर्वाळा दिला आहे. अशी माहिती साखर आयुक्तालयाच्या सूत्रांनी दिली. नियंत्रक डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांनी राज्यातील सर्व वैद्यमापन शास्त्र सहनियंत्रकांना एक पत्र पाठविले आहे.

**नियंत्रकांनी दिल्या या सुचना**

- लोडसेल ते जंक्शन बॉक्स व जंक्शन बॉक्स ते इंडिकेटर पर्यंतच्या सर्व केबल्स अखंड व ध कापलेल्या असतील. आवरण काढलेले नसावे.केबलवर चिकटपट्ट्या नसाव्यात.
- लोडसेल ते इंडिकेटर पर्यंतच्या केबल्सवर छुपे उपकरण लावू नये.
- आयटी किट मॉडेल अॅप्रूव्हल असलेल्या वहान काट्यालाच संगणक प्रणाली उपलब्ध असावी.
- वे इंडिकेटरला प्रिंटिंग सुविधा असावी.पावतीवर वहान क्रमांक नोंद करून सही शिक्क्यासह पावती द्यावी.

नव्या कार्यप्रणालीचा अवलंब करून क्षत्रिय वैद्यमापन शास्त्र अधिकाऱ्यांना आपापल्या क्षेत्रातील साखर कारखान्याच्या वजन काट्याची तपासणी करावी असे या पत्रात म्हटले आहे. साखर कारखान्यामधील उसाच्या वजनात शेतकऱ्यांची लूट होत असल्याच्या तक्रारी वैद्यमापन शास्त्र कार्यालयाला प्राप्त झाल्या आहेत.त्यामुळे काट्यांची तपासणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती.

समितीने वजनातील फसवणुकीला आळा घालण्यासाठी काही शिफारशी सुचविल्या आहेत. त्यानुसार काट्यांची तपासणी करण्यासाठी आता प्रमाणित संचालन प्रणाली नव्याने तयार करण्यात आली आहे. असे नमूद केले आहे.



---

# पाकिस्तान फायनलमध्ये

✔ **सिडनी:** ऑस्ट्रेलियाच्या सिडनी क्रिकेट ग्राउंडवर टी-२० विश्वचषक २०२२ स्पर्धेचा पहिला सेमीफायनल सामना खेळवला गेला. ज्यात पाकिस्तानने ७ गडी राखून विजय मिळवत फायनल गाठली आहे.

न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यातील या सामन्यात न्यूझीलंड संघानं प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पण पाकिस्तानच्या भेदक गोलंदाजीसमोर त्यांना केवळ १५२ धावांपर्यंतच मजल मारता आली. त्यानंतर पाकिस्तानने सलामीवीर बाबर आणि रिझवानच्या मदतीनं एक दमदार सुरुवात केली आणि अखेर ७ गडी राखून विजय मिळवला. १५३ धावांचे आव्हान गाठण्यासाठी मैदानात आलेल्या पाकिस्तानच्या संघानं आज सुरुवातच दमदार केली. सलामीवीर बाबर आणि रिझवान यांना धडाकेबाज अशी अर्धशतकं ठोकली. बाबर ५३ धावा करून बाद झाला, पण त्यानंतर रिझवानने झुंज कायम ठेवली.

---

# संजय राऊत यांची अटक बेकायदेशीर; पीएमएलए कोर्टाने ईडीला झापले

✔ **मुंबई :** पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणी संजय राऊत यांना ईडीने अटक केली होती. संजय राऊत आणि त्यांच्या निकटवर्तीयांनी मिळून हा भ्रष्टाचार केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला. त्यांच्या घरात छापेमारी करून ईडीने त्यांना ताब्यात घेतलं. संपूर्ण चौकशीअंती ईडीने त्यांना अटक केली. ३१ जुलै रोजी त्यांना अटक करण्यता आली होती. मात्र, ईडीने केलेली अटक बेकायदेशीर होती, असा महत्त्वाचा निर्वाळा पीएमएलए कोर्टाने दिला. यावरून पीएमएलए कोर्टाने ईडीला झापले आहे.

पीएमएलए कोर्टाने १२२ पानी आदेशपत्र जारी केले आहेत. संजय राऊतांना झालेली अटक बेकायदेशीर होती. या प्रकरणात ईडीने आपल्या मर्जीने आरोपी निवडले. राकेश आणि सारंग वाधवान हे या प्रकरणातील मुख्य आरोपी आहेत. संजय राऊत आणि प्रविण राऊत यांना अवैधरित्या पकडलं, असं पीएमएलए कोर्टाने त्यांच्या आदेशात म्हटलं आहे. तसंच, संजय राऊत आरोपी आहेत, याचे पुरावे द्या असंही कोर्टाने ईडीला म्हटलं आहे. दिवाणी खटले हे मनी लॉंड्रिंग किंवा आर्थिक गुन्हे अशा नावाखाली आणून निर्दोष लोकांना त्यात ओढून आणि अटक करून अशा परिस्थितीत आणणं हे न्यायालय मान्य करू शकत नाही. प्रवीण राऊत यांना फक्त दिवाणी खटल्यात अटक करण्यात आली तर संजय राऊत यांना काहीही कारण नसताना अटक केली गेली असल्याची महत्त्वाची टिप्पणीही पीएमएलए कोर्टाने केली.

कथित पत्राचाळ जमीन घोटाळाप्रकरणी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना ३१ जुलै रोजी अटक करण्यात आली होती. तेव्हापासून संजय राऊत तुरुंगात आहेत. अटक केल्यानंतर संजय राऊत यांना सुरुवातीला ईडीची कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर संजय राऊत यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. या अटकेनंतर राऊत आर्थर रोड कारागृहामध्येच होते.

याप्रकरणी ईडीने अधिक तपास करत पत्राचाळ घोटाळ्याप्रकरणात राऊत यांचा थेट हात असल्याचा आरोप केला होता. मात्र राऊतांचा या घोटाळ्याशी काहीच संबंध नाही असा युक्तीवाद राऊतांच्या वकिलांनी केला. परंतु, ईडीकडून राऊत हेच घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार असल्याचा दावा केला गेला. दरम्यान, आज झालेल्या सुनावणीत संजय राऊत यांना कोर्टाने जामीन मंजूर केला. परंतु, या जामीनाला ईडीने विरोध केला होता. ईडीने केलेली याचिका पीएमएलए कोर्टाने फेटाळून लावल्याने ईडीने याविरोधात मुंबई हायकोर्टात धाव घेतली. मुंबई हायकोर्टानेही ईडीची याचिका फेटाळून लावत संजय राऊतांच्या सुटकेचा मार्ग मोकळा केला. आज सायंकाळी सात वाजेपर्यंत सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर ते बाहेर येतील, अशी माहिती त्यांच्या वकिलांनी दिली.



---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नो कॉमेंटस्!


| कल्याण |
| --- |
| -------- |

| मेन बाजार |
| --- |
| -------- |

---

### निवृत्तीच्या रक्कमेसाठी पालिकेत आले; धाप लागून पायऱ्यावरच कोसळले

# उपचारासाठी पैसे न मिळाल्याची खंत, परिवहन कर्मचाऱ्याचा करुण अंत



✔ **सोलापूर :** महापालिका परिवहन उपक्रमाकडील निवृत्त कर्मचारी निवृत्तीनंतरची रक्कम दवाखान्यासाठी मिळावी म्हणून पाठपुरावा करण्यासाठी महापालिकेत आले असता कौन्सिल हॉलच्या पायऱ्या चढत असताना त्यांना धाप लागली. तातडीने त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.


महापालिका परिवहन उपक्रमातील निवृत्त कर्मचारी विलास पांडुरंग शिरसट (वय ६५ , रा.न्यू बुधवार पेठ) असे त्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते परिवहन उपक्रमामधून चार वर्षांपूर्वी निवृत्त झाले होते. निवृत्तीनंतरची साधारणतः सहा लाखांची रक्कम पालिका परिवहन उपक्रम देणे होते. त्यातील २५ ते ४० हजार रुपये रक्कम प्रशासनाने अदा केली होती. दरम्यान शिरसाट यांना हृदय विकाराचा त्रास होत होता. उपचारासाठी दोन लाख रुपये खर्च येणार असल्याचे डॉक्टरांनी त्यांना सांगितले होते. या उपचारासाठी ते पैसे मिळावेत याकरिता ते पालिकेत पाठपुरावा करीत होते. दरम्यान, बुधवारी ते महापालिका आवारात आयुक्तांना भेटण्यासाठी आले होते. येथील कौन्सिल हॉलच्या पायऱ्या चढत असतानाच त्यांना धाप लागली. यामुळे तातडीने सहकाऱ्यांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांची रुग्णालयातच प्राणज्योत मालवली. दरम्यान, कामगार नेते अशोक जानराव यांनी संबंधित निवृत्त कर्मचारी रुग्णालयात दाखल केल्याची महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांना भेटून माहिती दिली. आयुक्तांनी परिवहन उपक्रमातील अधिकारी पडगानूर यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले. पडगानूर यांनी रुग्णालयात जाऊन त्यांची माहिती घेतली. उपचारासाठी खर्च देण्याची तजवीज केली. अंत्यसंस्कारासाठी दहा हजार रुपये दिली. दरम्यान, परिवहनच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना यापूर्वी थोडी रक्कम दिली होती. पोलीस प्रवासी अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर निवृत्त कर्मचाऱ्यांना रक्कम अदा करण्याचे नियोजन असल्याचे आयुक्त शिवशंकर यांनी सांगितले.

**रकमा अदा कराव्यात**

निवृत्त कर्मचाऱ्यांना वेळेत या रकमा न मिळाल्याने या औषध उपचाराचीही अडचण निर्माण होत आहे. आज पैसे न मिळाल्याने अखेर निवृत्त कर्मचाऱ्यास मरण पत्करावे लागले. कायदा व नियमापेक्षा माणुसकीचा दृष्टिकोन ठेवून प्रशासनाने रकमा अदा कराव्यात अशी मागणी अशोक जानराव यांनी केली आहे.

---

सुराज्य
सोलापूर



पाहिजेत
ग्राफीक डिझायनर

- उमेदवार पदवीधर असावा.
- कोरल ड्रॉ, फोटोशॉप, इन डिझाईन आवश्यक.
- पेज लेआऊट, सर्व प्रकारचे जाहिरात डिझाईन आणि मराठी टायपिंग अनिवार्य.
- रात्रपाळीत काम करण्याची तयारी असावी.
- आकर्षक पगार मिळेल.

ऑफीसचा पत्ता
१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३
Email : dailysurajyaoffice@gmail.com या ईमेलवर अर्ज करावेत!